# The Bhabha Atomic Research Centre Employees' Co-op. Credit Society Ltd.

(Registration No.29770)

ISO 9001:2015 Certified

R-5 Shed, Behind RLG,Trombay, Mumbai-400085

Tel. : 2559 6134, 2559 4985/86
Fax : 022-2550 55 00
E-mail: barc.society@gmail.com
Website: www.barc-ecs.coms

Ref.No: BARC/CS/371

Date: May 1, 2023

## परिपत्रक / CIRCULAR

संस्थेच्या सन्माननीय भागधारक सभासदांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की दि.18 मार्च 2023 रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेच्या शिफारशीनुसार, संचालक मंडळाने VKSY (विक्रम कर्ज संरक्षण योजना) दि.01.05.2023 पासून लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

The Honorable Shareholders of the Society are informed through this circular that as per recommendation of Special General Body Meeting held on 18th March 2023, the Board of Directors has taken decision to implement the VKSY (Vikram Karj Saurakshan Yojana) w.e.f.01.05.2023.

विविध कर्जांचे व्याजदर खालीलप्रमाणे आहेत / The rate of interest for various loans are as follows:-

| | Type of loan | Interest | VKSY | Total Int. Rate |
|---|---|---|---|---|
| 1 | Ordinary Loan | 8.5% | 0.50% | 9.0% |
| 2 | Special Loan | 9.85% | 0.50% | 10.35% |
| 3 | Emergency Loan | 10.5% | N.A. | 10.5% |

कृपया सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी व सहकार्य करावे ही विनंती.

All the members are requested to take a note of this and co-operate with us.

THE B.A.R.C. EMPL. CO-OP. CR. SOC. LTD. Reg. No. 29770 OF 30-11-61

(हेमंत कोळी) / (Hemant Koli)
अध्यक्ष / Chairman
संचालक मंडळाच्या वतीने / on behalf of Managing Committee

***WITH A REQUEST TO PERMIT TO DISPLAY ON BTS***
**CAO(A), BARC**

02/05/2023

Checked by Shri R.K More, Manager
D:\YEAR 2023-2024\Circulars.doc

# The Bhabha Atomic Research Centre Employees' Co-op. Credit Society Ltd.

(Registration No.29770)

**ISO 9001:2015 Certified**

R-5 Shed, Behind RLG,Trombay, Mumbai-400085

Tel. : 2559 6134, 2559 4985/86
Fax : 022-2550 55 00
E-mail: barc.society@gmail.com
Website: www.barc-ecs.coms

Ref.No: BARC/CS/363

Date: April 28, 2023

## परिपत्रक

संस्थेच्या सन्माननीय भागधारक सभासदांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, दि.18 मार्च 2023 रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेतील निर्णयानुसार व संचालक मंडळाच्या दि.28 एप्रिल 2023 रोजी झालेल्या सभेत स्विकारलेल्या 'विक्रम कर्ज संरक्षण योजने'च्या नियम व अटींची अंमलबजावणी दि.01.05.2023 पासून लागू करण्यात आली आहे.

## विक्रम कर्ज संरक्षण योजना (VKSY)

सर्वसाधारण कर्ज, विशेष कर्ज यापैकी कोणतेही एक किंवा दोन्ही कर्ज घेतलेले सर्व सभासद हे 'विक्रम कर्ज संरक्षण योजने'चे सभासद असतील. ही योजना संपूर्ण सर्वसाधारण कर्ज तसेच संपूर्ण विशेष कर्जासाठी लागू असेल. सर्वसाधारण कर्ज व विशेष कर्जाच्या प्रत्येक महिन्याच्या उर्वरित शिल्लक कर्ज रकमेवर (outstanding loan) द.सा.द.शे.0.5% (रु.41.67 प्रती माह प्रती लाख) प्रमाणे दरमहाच्या वेतनातून वर्गणी कपात करण्यात येऊन सदर वर्गणी 'विक्रम कर्ज संरक्षण' योजने अंतर्गत वर्ग करण्यात येईल.

सभासदाचे दुर्दैवी निधन झाल्यास / स्थायी अपंगत्व आल्यास 'विक्रम कर्ज संरक्षण योजने' अंतर्गत सभासदाचे निधन झालेल्या तारखेस सर्वसाधारण कर्ज व विशेष कर्ज या दोन्ही कर्जाची किंवा दोन्हीपैकी एक जे बाकी असेल त्या कर्जाची शिल्लक रक्कम 'विक्रम कर्ज संरक्षण योजनेतून' पात्र मयत सभासदाच्या कर्ज खात्यात वर्ग करण्यात येऊन, अशा पात्र मयत सभासदाची सर्वसाधारण कर्जाची व विशेष कर्जाची शिल्लक रक्कम निरस्त केली जाईल.

'विक्रम कर्ज संरक्षण योजने' अंतर्गत लाभ घेण्यासाठी पात्र असलेले सभासद:-

1. कर्ज काढलेल्या दिनांकापासून प्रत्येक कर्जदार सभासद या योजनेसाठी पात्र असेल.
2. अ- सभासदाने कर्ज घेतल्यानंतर तीन महिन्याच्या आत सभासदाचा मृत्यु झाल्यास, मृत्यू झालेल्या दिनांकापर्यंत सलग सगळे हप्ते भरलेले असावेत.

   ब- सभासदाने कर्ज घेऊन तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असेल व सभासदाचा मृत्यु झाल्यास, मृत्यू झालेल्या दिनांकापासून मागील सलग तीन महिन्यांचे सलग हप्ते वेतनामधून कपात होऊन भरणा झालेले असावेत.

   उदा.जर एखाद्या सभासदाचा मृत्यु डिसेंबर महिन्यामध्ये झाला असेल तर त्याचे सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर या तीन महिन्यांचे सलग हप्ते वेतनातून भरलेले असावेत.

   क- एखादा कर्जदार सभासद प्रदीर्घ आजाराने ग्रस्त असल्यामुळे कामावर रुजू नसेल आणि त्याचे तीन महिन्याच्या वेतनकपाती मधून कर्ज हप्ता आला नसेल तर अशा संदर्भात विशेष बाब समजून आधारभूत कागदपत्र सादर केल्यास तो सभासद या योजनेस पात्र असेल. अशा बाबतीत दिशाभूल करण्यात आली असे निदर्शनास आल्यास सदर सभासदाच्या उर्वरीत कर्जफेडीची जबाबदारी जामिनदारांची असेल.

3. आत्महत्या – जर मयत सभासदाच्या मृत्यू दाखल्यावर मृत्यूचे कारण 'आत्महत्या' असे नमूद केले असेल तर मृत्यूचा दिनांक हा कर्ज काढलेल्या तारखेपासून बारा महिने किंवा बारा महिन्यापेक्षा जास्त असल्यास सदर सभासद या योजनेस पात्र ठरेल.
4. पतसंस्थेचा सभासद झाल्यांनतर स्थायी अपंगत्व (permanent disability) आल्यास– याबाबत आस्थापनेच्या प्राधिकृत वैद्यकीय समितीने (स्थायी अपंगत्वाच्या केसबाबत निर्णय घेणारी समिती) घोषित करून कामावरून कमी केल्यास त्याबाबतची कागदपत्रे संस्थेकडे सादर केल्यानंतर संचालक मंडळाच्या सभेमध्ये निर्णय घेऊन उर्वरित कर्ज निरस्त करण्यात येईल.

**निधन पावलेल्या / कायमस्वरूपी अपंगत्व आलेल्या पात्र सभासदांचे सर्वसाधारण कर्ज, विशेष कर्ज निरस्त करण्यासाठी विक्रम कर्ज संरक्षण योजनेअंतर्गत जमा झालेली रक्कम कर्ज खात्याकडे वर्ग करण्याबाबतच्या धोरणाबाबतची नियमावली**

1. सदर 'विक्रम कर्ज संरक्षण योजना' अधिमंडळाच्या विशेष सर्वसाधारण सभेने आणि सहकार विभागाच्या मंजुरीनंतर दि.1 मे 2023 पासून कार्यान्वित होईल. ज्या सभासदांनी सर्वसाधारण कर्ज व विशेष कर्ज घेतले असेल अशा सर्व सभासदांना त्यांच्या सर्वसाधारण कर्ज विशेष कर्ज अशा शिल्लक असलेल्या दोन्ही कर्जास बंधनकारक असेल.
2. सदर योजना ही ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालवली जाईल.
3. सदर योजनेसाठी प्रत्येक महिन्यात सभासदाच्या उर्वरित (सर्वसाधारण कर्ज व विशेष कर्ज) कर्ज शिल्लक रकमेवर द.सा.द.शे.0.5% दराने रक्कम दरमहाच्या वेतनातून कपात करून 'विक्रम कर्ज संरक्षण योजने' अंतर्गत वर्ग करण्यात येईल.
4. सदर योजना दि.1 मे 2023 पासून अंमलात आणली जाईल व त्यानंतर निधन पावलेल्या व कायमस्वरूपी अपंगत्व आलेल्या पात्र सभासदास 'विक्रम कर्ज संरक्षण योजने' अंतर्गत पात्र ठरलेल्या मयत सभासदांचे संपूर्ण कर्ज निरस्त करण्यात येईल.
5. जर एखाद्या महिन्यात कर्ज निरस्त करण्याची रक्कम ही 'विक्रम कर्ज संरक्षण योजने'तील निधीपेक्षा जास्त असेल तेव्हा मयत सभासदांच्या मृत्यु दिनांकाच्या प्राधान्य क्रमाने कर्ज निरस्त करण्यात येईल व शिल्लक राहिलेली कर्ज रक्कम पुढील महिन्यात वर्ग करण्यात येईल.
6. नैसर्गिक व अनैसर्गिक आपत्तीमध्ये मोठ्या प्रमाणात जीवित हानी झाल्यास अशा प्रसंगी उपलब्ध निधीतून समप्रमाणात कर्ज निरस्त करण्यात येईल.
7. या योजनेचा फेर-आढावा घेण्याचा संचालक मंडळाचा अधिकार व नियमात बदल करण्याचा किंवा नवीन नियम अंतर्भूत करण्याचा वार्षिक सर्वसाधारण / विशेष सर्वसाधारण सभेचा अधिकार अबाधित असेल. संस्थेच्या मंजूर उपविधीप्रमाणे संचालक मंडळ कार्यवाही करेल.

कृपया सर्व सभासदांनी याची नोंद घेऊन सहकार्य करावे.

BARC EMPL. CO-OP. CR. SOC. Reg. No. 29770 OF 30-11-61

**(हेमंत कोळी)**
**अध्यक्ष**

**(शिवाजी हगवणे)**
**मानद सचिव**

**संचालक मंडळाच्या वतीने**

***WITH A REQUEST TO PERMIT TO DISPLAY ON BTS***
**CAO(A), BARC**

Checked by Shri R.K.More, Manager
D:\YEAR 2023-2024\Circulars.doc